# पुन्हा एकदा टाय ब्रेकरमध्ये पुणेरी पलटनने मारली बाजी! बेंगळुरू बुल्सला नमवत  गुणतालिकेत गाठलं अव्वल स्थान

चेन्नई, २ ऑक्टोबर २०२५: प्रो कबड्डी लीग स्पर्धेतील १२ व्या हंगामातील ५९ वा सामना पुणेरी पलटन आणि बेंगळुरू या दोन्ही संघांमध्ये पार पडला. गेल्यावेळी जेव्हा हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते, त्यावेळी पुणेरी पलटनने टाय ब्रेकरमध्ये ६- ४ ने बाजी मारली होती. हा सामना देखील २९- २९ ने बरोबरीत राहिला आणि पुणेरी पलटनने टाय ब्रेकरमध्ये ६- ४ गुणांनी बाजी मारली.

या सामन्यात अस्लम इनामदार खेळू शकला नाही. त्याच्या जागी पंकज मोहतेने पुणेरी पलटन संघाचं प्रतिनिधित्व केलं. पुणेरी पलटनकडून पहिली चढाई करण्यासाठी पंकज मोहिते चढाईला आला. त्याने पाहिल्याच चढाईत १ गुण घेत संघाचं खातं उघडलं.  बेंगळुरू बुल्सकडून अलीरेजाने १ गुण घेत संघाचं खातं उघडलं. सुरुवातीच्या ५ मिनिटात पुणेरी पलटनकडे २ गुणांची आघाडी होती. सहाव्या मिनिटाला बेंगळुरू बुल्सचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने ९ - ५ गुणांसह ४ गुणांची आघाडी घेतली. सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे १२- ९ गुणांसह ३ गुणांची आघाडी होती.

पूर्वार्धातील हाफ टाइमनंतरही दमदार सुरुवात करत २ गुणांची कमाई केली . पूर्वार्धातील १५ मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे १५-११ गुणांसह ४ गुणांची आघाडी होती. पूर्वार्धात दोन्ही संघांमध्ये अटीतटीचा खेळ रंगला. पण पुणेरी पलटनने १७-१३ गुणांसह ४ गुणांची आघाडी कायम ठेवली.

उत्तरार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ १९-१६ गुणांसह ३ गुणांनी आघाडीवर होता. पुणेरी पलटनने ९ व्या मिनिटाला सुपर टॅकल करत गुणसंख्येत आणखी २ गुणांची भर घातली.

उत्तरार्धातील सुरुवातीचा १० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे २२-१९ गुणांसह ३ गुणांची आघाडी होती.  बेंगळुरू बुल्सने पुणेरी पलटनला मोठी आघाडी घेऊ दिली नाही. शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनकडे ४ गुणांची आघाडी होती. शेवटची ३ मिनिटे शिल्लक असताना दोन्ही संघ २५- २५ ने बरोबरीत आले. पुणेरी पलटनचा संघ नको त्या वेळी पहिल्यांदा ऑलआऊट झाला.  बेंगळुरू बुल्सने २८-२५ गुणांसह ३ गुणांची आघाडी घेतली. शेवटच्या मिनिटाला बेंगळुरूकडे २ गुणांची आघाडी होती. आदित्य शिंदेने १ गुण घेत पिछाडी कमी केली. पुणेरी पलटनने १ गुण घेत गुणसंख्या २९- २९ ने बरोबरीत आणली.

या सामन्याचा निकाल देखील टाय ब्रेकरने लागला. टाय ब्रेकरमध्ये पुणेरी पलटनचा संघ बेंगळुरू बुल्सवर भारी पडला. हा सामना पुणेरी पलटनने ६-४ ने आपल्या नावावर केला.